ADVERTORIAL




# आरती संग्रह

## श्री गणेश म्हणजे अबोधिततेचे रूपच

**सहज योग प्रणेत्या परम पूज्य आदिशक्ती माताजी श्री निर्मला देवी यांनी संपूर्ण विश्वात भारतीय संस्कृतीचा प्रचार प्रसार केला. आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक म्हणजेच श्रीगणेश. त्यांनी विश्वातील तमाम साधकांना श्रीगणेशाचे महात्म्य, त्याचे आपल्या मधील स्थान आणि त्याला आपल्या मध्ये कसे जागृत करावे यासंबंधी विस्तृत मार्गदर्शन केले. तसेच विश्वातील लाखो साधकांमध्ये श्रीगणेश तत्त्व जागृत केले. परिणामी आज जगातील लाखो साधक श्री गणेशाची पूजा आणि आराधना करीत आहेत. इतकच काय तर ज्यांना गणपतीतला 'ग' सुद्धा कळत नव्हता असे परदेशातील साधक आज श्रीगणेश अथर्वशीर्षाचा पाठ करतात.**



**परम पुज्य श्री माताजी निर्मला देवी (सहज योगाच्या संस्थापिका)**
**कुंडलिनी जागृतीद्वारे आत्मसाक्षात्कार**




श्री गणेश हे प्रथम पूजनीय आहेत. ते आपल्या मूलाधार चक्रावर स्थित आहे. मूलाधार चक्र हे आपल्या माकड हाडाच्या खाली असते. माकड हाडांमध्ये कुंडलिनी शक्तीचा वास असतो जी गौरी स्वरूप आहे. श्रीगणेश या शक्तीचे मूलाधार चक्रावर राहून रक्षण करीत असतात. ज्यावेळी साधकांमध्ये कुंडलिनी जागृतीची इच्छा निर्माण होते आणि ती शक्ती जागृत करणारी अधिकारी व्यक्ती समोर असते त्यावेळी श्रीगणेशाच्या कृपा आशीर्वादानेच ही शक्ती जागृत होते. श्रीगणेशाच्या आज्ञेशिवाय कुंडलिनी शक्तीच जागरण होऊ शकत नाही. अबोधिता, पावित्र्य, मांगल्य, सुज्ञता आणि शहाणपणा हे श्रीगणेशाचे गुण आहेत. त्याचे अस्तित्व प्रत्येक अणुरेणूत चैतन्य स्वरूपात आहे. आपल्यामधील प्रत्येक चक्रावर श्रीगणेशाचा वास असतो.

श्री गणेश अबोधिततेचे अधिपती आहेत. त्यांची अबोधितता सागरासारखी आहे. जगातील मोठ मोठ्या व्यक्तींकडे पाहिले तर दिसून येते की त्यांच्याजवळ अबोधिततेची शक्ती होती. म्हणूनच त्यांचे ध्येय महान होते, त्यांना ध्येयपूर्तीचाच ध्यास होता, बाकी कशाचीच तमा नव्हती. ही उच्च ध्येय संकल्पना अबोधिततेमधूनच निर्माण होते व त्यामुळेच ध्येयपूर्तीसाठी मार्गदर्शनही मिळते. मग त्यासाठी सत्ता आणि अधिकार या गोष्टी गौण होतात. नाहीतर सत्तेच्या लोभापायी हाहाकार माजवणारे अनेक लोक येतात व जातात पण कुणालाच त्यांची आठवण नको असते. अशा थोर व्यक्ती म्हणजेच अबोधिततेची चालती-बोलती उदाहरणे आहेत आणि अबोधिततेमुळेच त्यांच्याजवळ सुज्ञता पण होती. म्हणून आपण सर्वांनी अबोधिततेचा सदैव आदर व सन्मान केला पाहिजे. अबोधितता बळकट करण्यातच आपल्या जन्माचे सार्थक आहे. श्री गणेशांचा मोठा गुण म्हणजे सुज्ञता. या सुज्ञतेमुळेच ते नेहमी यशस्वी होतात.

सूर्यामध्ये जशी प्रकाश देण्याची शक्ती आहे, तशीच श्री गणेशामध्ये ही 'अबोधिता' शक्ती आहे. ही जी अबोधितेची शक्ती परमेश्वरांनी आपल्यामध्ये भरलेली आहे, ह्या अबोधितेच्या शक्तीला आपण पूजतो. म्हणजे आम्ही सुद्धा असे अबोध झाले पाहिजे. अबोधितेचा अर्थ पुष्कळांना असा वाटतो की, आपण अज्ञानी झाले पाहिजे. अबोध शब्दामध्ये अर्थ असा आहे की, जो एक भोळेपणा एखाद्या लहान मुलात असतो तो भोळेपणा किंवा निरागसता आपल्यामध्ये आली पाहिजे. हे किती मोठे तत्त्व आहे ते आपल्या लक्षात येत नाही.

अबोधितेचे लक्षण हे आहे की, माणसाला सगळ्यांच्यामध्ये पावित्र्य दिसते. कारण स्वत:मध्ये पावित्र्य आल्यामुळे, तो अपवित्र नजरेनी कोणाकडे बघत नाही. आता आपल्याकडे पवित्रता समजावून सांगायला नको. आपल्याकडे माणसाला पवित्रता काय आहे हे माहीत आहे. इंग्लंडमध्ये, अमेरिकेत समजवायला पाहिजे कारण त्यांची डोकी फिरलेली आहेत. पण तुम्ही अजून सुज्ञ आहात. विशेषतः ह्या भारतात तरी देवकृपेने , अष्टविनायक कृपेने म्हणा किंवा आपल्या पूर्वपुण्याईने म्हणा, आपल्या गुरुसंतांनी केलेल्या सेवेमुळे म्हणा या पृथ्वीवर महाराष्ट्र ही एक अशी भूमी आहे की इथून ही पवित्रता मात्र अजून हललेली नाही. ही फार मोठी गोष्ट आहे.

**सहज योगच्या अधिक माहिती पुढील लिंक पाहा. www.sahajayogamarathi.com**
sahajayoga.org | sahajayoga.org.in | nirmaldham.org | sahajayogamumbai.org


एम बी रत्नन्नावार, उमेश भोर आणि सहज योगची टीम यांनी संकलन केले आहे. Email: mbratan@gmail.com


### सुखकर्ता दु:खहर्ता

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ॥
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची । कंठी झळके माळ मुक्ता फळांची ॥१॥
जय देव, जय देव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रे मन कामना पुरती ॥धृ॥
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुमकुम केशरा ॥
हिरेजडित मुकुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ॥२॥
जय देव, जय देव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रे मन कामना पुरती ॥धृ॥
लंबोदर पितांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे, सुरवरवंदना ॥३॥
जय देव, जय देव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रे मन कामना पुरती ॥धृ॥

### शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा । वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जल निर्मळ वाहे झुळझूळां ॥ १ ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पूरगौरा ॥ ध्रु० ॥
कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा । अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय देव० ॥ २ ॥
देवीं दैत्य सागरमंथन पै केलें । त्यामाजीं जें अवचित हळाहळ उठिलें ॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें । नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥ जय देव० ॥ ३ ॥
व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी । रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥ जय देव जय देव० ॥ ४ ॥

### श्री देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारीं जन्ममरणाते वारी । हारी पडलो आता संकट नीवारी ॥ १ ॥
जय देवी जय देवी जय महिषासुरमथनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ धृ. ॥
त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज से नाही । चारी श्रमले परंतु न बोलावे काहीं ॥
साही विवाद करितां पडिले प्रवाही । ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ॥ २ ॥
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशापासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा । नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

### आरती विठ्ठलाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा वामाङ्गी रखुमाईदिसे दिव्य शोभा ।
पुण्डलिकाचे भेटि परब्रह्म आले गा चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥
जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥धृ०॥
तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी कासे पीताम्बर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी गरुड हनुमन्त पुढे उभे राहती ॥२॥
धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥३॥
ओवाळू आरत्या कुरवण्ड्या येती चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिण्ड्या पताका वैष्णव नाचती पण्ढरीचा महिमा वर्णावा किती ॥४॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती चन्द्रभागेमाजी स्नाने जे करिती।
दर्शन होळामात्रे तया होय मुक्ति केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥५॥
जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥धृ०॥

### श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना॥ सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना ॥ १ ॥
जय देव जय देव जय श्री गुरुद्त्ता । आरती ओवाळिता हरली भवचिंता ॥ धृ ॥
सबाह्य अभ्यंतरी तू एक द्त्त । अभाग्यासी कैची कळेल हि मात ॥
पराही परतली तेथे कैचा हेत । जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥
दत्त येऊनिया ऊभा ठाकला । भावे साष्टांगेसी प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला । जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥ ३ ॥
दत्त दत्त ऐसें लागले ध्यान । हरपले मन झाले उन्मन ॥
मी तू पणाची झाली बोलवण । एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥

### आरती साईबाबाची

आरती साईबाबा । सौख्यदातार जीवा। चरणरजातली ।
द्यावा दासा विसावा, भक्ता विसावा ॥ आ०॥ध्रु ०॥
जाळुनियां अनंग। स्वस्वरूपी राहेदंग । मुमुक्षूजनां दावी ।निज डोळा श्रीरंग ॥ आ०॥ १ ॥
जयामनी जैसा भाव । तया तैसा अनुभव। दाविसी दयाघना । ऐसी तुझीही माव ॥ आ०॥ २ ॥
तुमचे नाम ध्याता। हरे संस्कृती व्यथा ।
अगाध तव करणी। मार्ग दाविसी अनाथा ॥ आ०॥ ३ ॥
कलियुगी अवतार । सगुण परब्रह्मः साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥ द०॥ आ०॥ ४ ॥
आठा दिवसा गुरुवारी । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया । भवभय निवारी ॥ आ०॥ ५ ॥
माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरज सेवा ।
मागणे हेचि आता । तुम्हा देवाधिदेवा ॥ आ०॥ ६ ॥
इच्छित दिन चातक। निर्मल तोय निजसुख ।
पाजावे माधवा या । सांभाळ आपुली भाक ॥ आ०॥ ७ ॥

### घालीन लोटांगण

घालीन लोटांगण, वंदीन चरण । डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ।
प्रेमें आलिंगन, आनंदे पूजिन । भावें ओवाळीन म्हणे नामा ॥१॥
त्वमेव माता च पिता त्वमेव। त्वमेव बंधुक्ष्च सखा त्वमेव ।
त्वमेव विध्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव॥२॥
कायेन वाचा मनसेंद्रीयेव्रा, बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात ।
करोमि यध्य्त सकलं परस्मे, नारायणायेति समर्पयामि ॥३॥
अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्र भजे ॥४॥
हरे राम हर राम, राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।

### मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्।
ते हं नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा:
ॐ राजाधिराजाय प्रसह्ये साहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे
स मे कामान्कामकामाय मह्यम्। कामेश्वरो वैश्रवणो ददातु।
कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नम: ॐ स्वस्ति
साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी
स्यात्सार्वभौम: सार्वायुष आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंता या एकराळिति
तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुत: परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति
एकदंतायविद्महे वक्रंतुडाय धीमहि तन्नोदंती प्रचोदयात्










- Agro Tourism
- Chulghar- Huts Restaurant
- AC Dining Hall
- Wedding and Event Lawn
- Accommodation
- Conference Hall
- Amrai

निसर्गरम्य वातावरणात
सहजयोग ध्यान कार्यशाळा
आणि प्रशिक्षणाचे उत्तम स्थान
मायभुमी ॲग्रो रिसॉर्ट
Contact : 8454880906/ 8369559017/ 9022953904
www.mybhumiagroresort.com